गीत ः आठवांच्या गर्द रानी अल्बम ः तु , मी आणि पाऊस

गायिका ः महालक्ष्मी अय्यर शब्द ः स्पृहा जोशी संगीत ः ऋषीकेश कामेरकर

सावर रे मन हळवे

मन हळवे का होई बावरे
मौन रेशमी ही सोन पालवी
रिमझिमत्या धारांत सजली स्वप्ने नवी
राजसा हे गीत माझे सुर सारे तुझे
राजसा हे गीत माझे सुर सारे तुझे
गंध दाटला पावसात नाहता
चिंब जाहले जाणता अजाणता

पापणी सांगते गुज हे लाजुनी
श्वास हा वेडावला उधाणता
शहारली सांज ही मेघधून आसावली
साऱ्या दिशांना भास होई का तुझा
धुंद गाते रान सारे हासले चांदणे
गंध दाटला पावसात नाहता
चिंब जाहले जाणता अजाणता

माझ्या वाटेवरी हिरव्या पानातुनी
श्रावण गाणे कोण गाई सांग ना
भूल घातली कोणी निळी निळी
बेहोष वारा मनरंगी ओल्या सरी
आठवांच्या गर्द रानी पाखरू हे तुझे
आठवांच्या गर्द रानी पाखरू हे तुझे
गंध दाटला पावसात नाहता
चिंब जाहले जाणता अजाणता